Publication : Lokmat (Marathi)    Date : 13.01.2014
Edition : Hello Gondia    Page No : 02
Subject : Celebration of Traffic Safety Week at Different Place by Adani Foundation, Tiroda

# ठिकठिकाणी रस्ता सुरक्षा अभियान

**गोंदिया :** महामार्ग पोलीस केंद्र डोंगरगाव कॅम्प डुग्गीपार आणि अदानी फाऊंडेशन तिरोडाचे संयुक्त विद्यमाने जी.ई.एस. विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय रावणवाडी ग्रेथे रस्ता सुरक्षा सप्ताहानिमित्य विद्यार्थ्यांसाठी मार्गदर्शन शिबिर नुकतेच पार पडले. महामार्ग पोलीस केंद्र डोंगरगाव येथील सहायक पोलीस उपनिरीक्षक प्र.म.खोब्रागडे तसेच कर्मचारी मार्गदर्शन करण्यासाठी उपस्थित होते.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डी.एम. वासनिक होते. प्रमुख पाहूणे म्हणून उपप्राचार्य पी.आर. किरनापुरे, तसेच सर्व शिक्षक कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमात रस्ता सुरक्षाबद्दल पोलीस हवालदार श्रीधर शहारे, शिक्षक सी.बी. बिसेन यांनी मार्गदर्शन केले. यावेळी प्र.म. खोब्रागडे यांनी अपघात घडण्याच्या प्रमुख कारणावर प्रकाश टाकला. नैसर्गिक, तांत्रिक व मानवी चुकामुळे होणाऱ्या अपघाताची सविस्तर माहिती दिली. अपघातांची संख्या कमी करावयाची असेल तर शिस्त पाळा व अपघात टाळा असा संदेश दिला.

यानंतर प्राचार्य डी.एम. वासनिक यांनी अपघाताच्या कारणाबद्दल वाहन चालविताना विद्यार्थ्यांनी कानात हेड फोन लावू नये. तसेच लवकर निघा, हळू चालवा व सुखदुप पोहोचा, असा मोलाचा सल्ला दिला. कार्यक्रमाचे संचालन शिक्षिका जोत्सा धुळसे यांनी तर आभार नायोशी बरकुंट यांनी मानले. कार्यक्रमात ना.पो.शि.चौधरी; भगत व रहांगडाले यांनी सहभाग घेतला.

यानंतर महामार्ग पोलीस केंद्र डोंगरगाव कॅम्प डुग्गीपार महामार्ग पोलीस केंद्र गडेगाव आणि अदानी फाऊंडेशन तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने रामेश्वरास जमनादास लोहिया विद्यालय सौंदड येथे रस्ता सुरक्षा अभियान अंतर्गत कार्यक्रम घेण्यात आला. शाळेतील ३०० विद्यार्थ्यांची मिरवणूक काढण्यात आली. मिरवणूक गावात फिरवून वाहतूक नियम तसेच पादचारी नियमांच्या घोष वाक्यांच्या घोषणा देवून प्रसार व प्रचार करण्यात आला. नंतर मिरवणूक शाळेच्या प्रांगणात परत येवून सभेत रुपांतर झाले. असर फाऊंडेशन भंडारा तर्फे उपस्थित विद्यार्थी, मंचावरील मान्यवर तसेच प्रेक्षकगण यांना कलापथकाच्या कार्यक्रमातून पथनाट्यांचे माध्यमातून रस्ता सुरक्षा नियमांचे महत्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष जगदीश लोहिया होते. प्रमुख पाहुणे म्हणून मुख्याध्यापक शिंदे, घाटबांधे, अग्रवाल, चिखलोंडे, चुटे, महामार्ग पोलीस ठाकूर उपस्थित होते. प्रास्ताविक सहायक पोलीस उपनिरीक्षक खोब्रागडे यांनी केले. अपघातावर आळा घालण्यासाठी रस्ता सुरक्षा अभियानाचे महत्व पटवून दिले. अध्यक्षांनी वाहतूक नियमांचे पालन केल्यामुळे होणारे फायदे पटवून दिले. पोलीस हवालदार शहारे, गायकवाड, ईश्वर, बरकुंट, डाहाके, मेश्राम, रवी चौधरी, भगत, सिडाम, गुल्हाने, रहांगडाले, कुंभरे, शहारे यांच्या सहकार्याने पार पडले. संचालन कल्पना काळे यांनी तर आभार शिंदे मानले.



रस्ता सुरक्षा अभियनाच्या रॅलीत सहभागी वाहतूक पोलीस व विद्यार्थी.

तिरोडा येथे महामार्ग पोलीस केंद्र डोंगरगाव आणि अदानी फाऊंडेशन तिरोडाच्या संयुक्त विद्यमाने रस्ता सुरक्षा अभियानाचे कार्यक्रम पूर्व माध्यमिक उत्तर बुनियादी शाळा तिरोडाचे प्रांगणात पार पडले. सदर शाळेतील व शहीदं मिश्रा विद्यालय तिरोडा येथील एकूण ३५० विद्यार्थी हजर होते. असर फाऊंडेशन भंडारा तर्फे उपस्थित विद्यार्थी, मंचावरील मान्यवर, शिक्षक, शिक्षिका, प्रतिष्ठीत नागरिक व प्रेक्षक यांना कलापथकाचे कार्यक्रमातून पथनाट्याच्या माध्यमातून रस्ता सुरक्षा नियमांचे महत्व पटवून देण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष उपविभागीय पोलीस अधिकारी दिलीप गिरे होते. प्रमुख पाहूणे म्हणून मुख्याध्यापिका लांजेवार, शहीद मिश्रा विद्यालयाचे उपप्राचार्य श्रृंगारपवार, अदानीचे सुबोधकुमार सिंग, सुरक्षा अधिकारी सुहाष वाकोडकर, वैद्य उपस्थित होते. प्रास्ताविक भाषणात खोब्रागडे यांनी वाहतूक नियमांचे महत्व पटवून दिले. नियम पाळल्यामुळे अपघात टळतात व जीवहानी होत नसल्याचे सांगितले. कार्यक्रमाचे संचालन निशा भगत, आभार नायक पोलीस शिपाई बरकुंट यांनी मानले. कार्यक्रमासाठी पोलीस हवालदार शहारे, गायकवाड, नायक पोलीस रवी चौधरी, डाहाडे, नामदेवे, भगत, ढेकवार, रहांगडाले, कुंभरे यांनी सहकार्य केले.

२५ व्ये रस्ता सुरक्षा अभियान ३ जानेवारी ते १७ जानेवारी २०१४ निमित्य महामार्ग पोलीस केंद्र डोंगरगाव कॅम्प डुग्गीपार आणि अदानी फाऊंडेशन तिरोडा यांच्या संयुक्त विद्यमाने गणेश विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालय गुमाधावडा येथील प्रांगणात सकाळी ११.४५ वाजता रस्ता सुरक्षा अभियानांतर्गत कार्यक्रमाद्वारे पार पडले. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थापक राधेलाल पटले होते. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अदानीचे समन्वयक सुबोधकुमार सिंग, सुरक्षा अधिकारी सुहाष काळोडकर, मुख्याध्यापक शेखर पटले, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष जैजाळ व पारधी उपस्थित होते. कार्यक्रमाला शिक्षक, शिक्षिका आणि विद्यार्थी तसेच गावातील प्रतिष्ठीत नागरिक असे जवळपास ६०० लोक कार्यक्रमात उपस्थितहोते.

कार्यक्रमाचे संचालन व्ही.के. उकेबोंद्रे यांनी केले. यावेळी उपस्थित लोकांना सुरक्षा अधिकारी सुहाष वाळोडकर, शेतकरी संघटनेचे अध्यक्ष माणिक जैजाळ, सुबोधकुमार सिंग, संस्थापक आर.बी. पटले यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी आपापल्या भाषणामध्ये वाहतुकीच्या नियमांचे महत्व विषद करुन सांगितले. वाहतुकीचे नियम प्रत्येक व्यक्तीने आपल्या जीवनात आचरणात आपल्यास वाढत्या अपघाताला आळा घालता येईल व आपले पुढील भविष्य सुखमय होईल. भारताच्या औद्योगिक विकासामध्ये हातभार लावण्यास मदत होईल. जर आपण आपल्या जीवनात सर्वांनी वाहतुकीचे नियम पाळावे. प्रतिज्ञेने कार्यक्रमाची सांगता झाली. आभार परशुरामकर यांनी मानले.

अदानी पॉवर हाऊसचे गेट क्र.३ समोर बैलगाडी, ट्रक, टॅम्पो, ट्रेलर, ट्रॅक्टर आणि दुचाकी चालकांना सुबोधकुमार सिंग, वाकोडकर, खोब्रागडे कर्मचाऱ्यांच्या सहकार्याने रिफ्लेक्टर लावण्यात आले व ३०० पत्रके वाटप करण्यात आली.

1) Adani Foundation, Tiroda along with State Highway Police organise programme in two schools (G. E. S. Maha-Vidyalaya , Ravanwadi and Ganesh Kanishtha Maha-Vidayalaya, Gumadhawada) about the importance of Traffic & Road Safety.
2) On SH-249 in front of Gate-3, Reflectors & 300 Pamphlets were distributed by Adani Foundation, Tiroda.